# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210


क्रं.उशिनाग/ शिष्यवृत्ती/ ५१६० /२०२१ दिनांक ०९/०९/२०२१

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. संचालक, शासकीय/सर्व प्राचार्य अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे त्वरीत वितरणाबाबत**

**संदर्भ :- उशिस/शिष्य-२०२१/डीबीटी/१००४८, दि. ०८.०९.२०२१**

उपरोक्त विषयाबाबत राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे आधार संलग्न बँक खातेमध्ये शिष्यवृत्ती रक्कम पीएफएमएस प्रणालीव्दारे जमा होते. तथापि काही विद्यार्थ्यांना त्यांचे खाते क्रमांक आधार क्रमांकाशी संलग्न न झाल्यामुळे (Aadhar Number is not seeded in NPCI), खाते क्रमांक निष्क्रीय असल्यामुळे (Inoperative) इ. कारणामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा झालेली नसल्याचे दिसून येते.

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खातेक्रमांशी आधार संलग्न करणेसाठी आवश्यक प्रक्रियेबाबतची माहिती देण्यात आलेली आहे. तसेच त्यासाठी बँकमध्ये जमा करावयाच्या अर्जाची प्रत देखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थी जवळच्या पोस्ट ऑफीसमध्ये भेट देऊन त्यांचा मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, पॅनकार्ड (उपलब्ध असेल तर), शिष्यवृत्ती अर्ज क्रमांक या आधारे इंडिया पोस्ट पेमेंटस बँकेचे आधार संलग्न असलेले साधारण बचत खाते उघडण्याचा लाभ घेऊ शकतात.

तरी आपल्या महाविद्यालयातील शिष्यवृत्ती वितरण प्रलंबित विद्यार्थ्यांचा आढावा घेऊन शिष्यवृत्ती वितरणाबाबत येणाऱ्या अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे ८ दिवासात सादर करण्यात यावा.

(डॉ. संजय ठाकरे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

Scanned with CamScanner